वाचले - 1) महाराष्ट्र नागरी सेवा (जेष्ठतेचे विनियमन) नियमावली, 1982
2) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2011, प्र.क्र.284/12, दिनांक 21/10/2011

---

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
क्र.मह/आस्था/कार्या.5अ.2/24/2021
अहमदनगर दिनांक 11 /01/2021

विषय - पहारेकरी संवर्गातील कर्मचा-यांची दिनांक 01/01/2021 रोजीची प्रारुप ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत.

ज्ञापन

उपरोक्त नमुद संदर्भ क्र.1 चे नियमावलीमधील नियम 4 (1) (2) (अ) व (ब) नुसार तसेच संदर्भ क्र. 2 वरील शासन निर्णयातील सुचनानुसार या कार्यालयाचे आस्थापनेवरील पहारेकरी संवर्गातील कर्मचा-यांची दि.01/01/2021 या अर्हता दिनांकावरील प्रारुप ज्येष्ठतासूची तयार करणेत आलेली आहे.

सदरची प्रारुप ज्येष्ठता सूची www.ahmednagar.nic.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सर्व कार्यालय प्रमुखांनी / शाखा प्रमुखांनी विषयांकित प्रारुप ज्येष्ठता सूची सदर संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच अधिनस्त असलेल्या पहारेकरी संवर्गातील सर्व कर्मचा-यांचे (कार्यरत, निलंबित व रजेवर असलेल्या) निदर्शनास आणून देवून व त्याबाबत त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेऊन दप्तरी ठेवावी. याबाबतचा अनुपालन अहवाल समवेत जोडलेल्या प्रमाणपत्रासह दि.18/01/2021 अखेर न चुकता इकडेस सादर करावा.

सदर सूचीबाबत हरकती असल्यास, सदरच्या हरकती स्पष्ट शब्दांत व योग्य त्या पुराव्यांसह / कागदपत्रांसह दि.09/02/2021 अखेर आपलेकडेस प्राप्त करुन घ्याव्यात. सदरच्या हरकतींसमवेत आवश्यक पुरावे / कागदपत्रे सादर केले आहेत किंवा कसे याबाबतची खात्री करुन, दिनांक 09/02/2021 अखेर प्राप्त होणा-या हरकती दि. 10/02/2021 रोजी खास दुतामार्फत या कार्यालयास न चुकता सादर कराव्यात. हरकती प्राप्त नसल्यास तसा निरंक अहवाल देखील सदर दिनांकास इकडेस न चुकता सादर करावा. दि. 10/02/2021 अखेर आवश्यक पुराव्यांसह/कागदपत्रांसह या कार्यालयास प्राप्त होणा-या हरकती विचारात घेण्यात येतील. सदर दिनांकानंतर हरकती स्वीकारण्यात येणार नाहीत याची सर्व कार्यालय प्रमुखांनी / शाखा प्रमुखांनी नोंद घेऊन सर्व संबंधित कर्मचा-यांना देखील याबाबत अवगत करावे.

आपले आस्थापनेवरील सर्व कार्यरत कर्मचा-यांची नावे प्रारुप जेष्ठतासूचीमध्ये समाविष्ट आहेत किंवा कसे याबाबत कार्यालय प्रमुख यांनी खात्री करावी. एखाद्या कर्मचा-यांचे नाव प्रारुप जेष्ठतासूचीमध्ये समाविष्ट नसल्यास तात्काळ इकडेस अवगत करावे. ज्येष्ठता सूची सर्व संबंधित कर्मचा-यांचे निदर्शनास आणुन देण्याची जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुख / शाखा प्रमुख यांचेवर राहिल.

सही /-
(डॉ.राजेन्द्र ब.भोसले, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी अहमदनगर

प्रति,
शाखा प्रमुख ------------------------------.
तहसिलदार ------------------------------.
उपविभागीय अधिकारी ------------------------------.
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र. , अ.नगर

प्रत - मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

(संदीप निचित)
निवासी उपजिल्हाधिकारी अहमदनगर.

Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारी अहमदनगर यांचे कार्यालयातील पहारेकरी संवर्गाची दिनांक 01/01/2021 ची तात्पुरती ज्येष्ठतासूची

| अ. क्र. | ज्येष्ठता क्रमांक | कर्मचा-याचे संपूर्ण नाव | प्रवर्ग # (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मदिनांक | नियुक्ती दिनांक | नियुक्तीचा मार्ग | ज्येष्ठता दिनांक/ ज्येष्ठतेचा मानीव दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | 1 | श्री.हनुमान सखाराम बोरगे | अजा | 01/06/1962 | 29/05/1984 | सरळसेवा | 04/07/1984 | 31/05/2022 | 9 वी | कार्यरत |
| 2 | 2 | श्री.मोहंमद इकबाल ताज मोहंमद शेख | खुला | 16/05/1961 | 14/08/2006 | समावेश | 18/08/2006 | 31/05/2021 | 9 वी | कार्यरत |
| 3 | 3 | श्री.राजाराम नामदेव गायकवाड | खुला | 27/01/1963 | 14/08/2006 | समावेशन | 01/09/2006 | 31/01/2023 | 6 वी | कार्यरत |
| 4 | 4 | श्री.मदन मारुती कु-हे | इमाव | 14/01/1964 | 14/08/2006 | समावेशन | 01/09/2006 | 31/01/2024 | 4 थी | कार्यरत |
| 5 | 5 | श्री.मच्छिंद्र भानुदास नन्नवरे | अजा | 20/06/1970 | 14/08/2006 | समावेशन | 01/09/2006 | 30/06/2030 | 9 वी | कार्यरत |
| 6 | 6 | श्री.चंद्रकांत तुळशीराम आरोटे | खुला | 01/06/1964 | 09/06/2008 | पदोन्नती | 01/08/2008 | 31/05/2024 | 8 वी | कार्यरत |
| 7 | 7 | श्री.संतोष महादू बारसे | भजब | 13/01/1976 | 22/10/2008 | अनुकंपा | 27/10/2008 | 31/01/2036 | 6 वी | कार्यरत |
| 8 | 8 | श्री.संतोष बाळासाहेब झावरे | खुला | 24/06/1981 | 22/10/2008 | अनुकंपा | 01/11/2008 | 30/06/2041 | 8 वी | कार्यरत |
| 9 | 9 | श्रीमती इंगळे लिला कमलाकर | अ.जा. | 20/09/1978 | 22/10/2008 | अनुकंपा | 22/11/2008 | 30/09/2038 | 7 वी | कार्यरत |
| 10 | 10 | श्री.ज्ञानेश्वर विश्वनाथ ढेसले | खुला | 02/01/1978 | 04/07/2012 | अनुकंपा | 05/07/2012 | 31/01/2038 | 9 वी | कार्यरत |
| 11 | 11 | श्री.गौतम पंढरीनाथ गायकवाड | अजा | 11/02/1976 | 04/07/2012 | अनुकंपा | 23/07/2012 | 29/02/2036 | 9 वी | कार्यरत |
| 12 | 12 | श्री.रणजित बबन माळी | अज | 20/06/1983 | 04/07/2012 | अनुकंपा | 23/07/2012 | 30/06/2043 | 8 वी | कार्यरत |

**स्वाक्ष प्रतीवर मा.जिल्हाधिकारी**
**यांची स्वाक्षरी असे.**

(संदीप निचित)
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी अहमदनगर करीता.

Scanned with CamScanner